REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 3 | DECEMBER - 2021

# तुकारामांच्या अभंगांचे विविध विषय

प्रा.डॉ. रवींद्र सोमोशी
सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
सुंदरराव मोरे महाविद्यालय, पोलादपूर, रायगड.

सारांश :–

**संत तुकारामांच्या अभंगाची पार्श्वभूमी :-**

तुकारामांचे अभंग हा ह्या चरित्राचा पहिला आधार म्हणून सांगितले खरे, पण अभंगांची निवड कशी केली, कोणते गाथे पाहिले व प्रमाण मानले हे सांगितले पाहिजे. याविषयी पांगारकर म्हणतात, ''माधवचंद्रोबानी तुकारामांची गाथा शिळाप्रेसवर प्रथम शके १७८७-८९ मध्ये छापून प्रसिद्ध केली. यात ३३२८ अभंग छापले आहेत. यानंतर सर अलेक्झांडर ग्रँट, मुंबई शाळाखात्याचे डायरेक्टर, यांच्या शिफारशीवरून सरकारने २४ हजार रूपये खर्चून विष्णुशास्त्री पंडित व शंकर पांडूरंग पंडित यांजकडून शोध करवून साडेचार हजार अभंगांचा गाथा इंदुप्रकाश प्रेसकडून छापविला. पंडितांनी देहू, तळेगाव, कडूस व पंढरपूर येथील जून्या प्रती पाहून त्यावरून एक प्रत तयार करून हा गाथा शके १७९१ मध्ये छापिला. ह्या गाथ्यांवर वारकऱ्यांचे त्यावेळचे प्रसिद्ध पुढारी भाऊ काटकर यांचा 'हा ग्रंथ आम्ही देहू मुक्कामी पाहिला, सर्वांनी घेण्यायोग्य आहे' असा ढोबळ अक्षरांनी छापलेला एका पानावर शिक्का आहे.''

महिपतबोवांच्या आधारे ह्या गाथ्याला तुकारामांचे चरित्र इंग्रजीत व मराठीत जोडले आहे. ज्या जुन्या वह्यावरून हा गाथा तयार केला त्या वह्या मी पाहिल्या आहेत. त्या शे-सव्वाशे वर्षीमागच्या नाहीत तथापि त्यांना परंपरा असलीच पाहिजे. पंडितांना संताजी जगनागाड्यांची वही पाहण्यास मिळाली नव्हती हे उघड आहे तथापि, हा 'इंदुप्रकाश' गाथा एकंदरीत फार चांगला आहे. छापील गाथ्यात हाच गाथा सर्वोत्तम आहे. यानंतर माडगावकरांनीही पाठभेदांसह एक गाथा छापला आहे. आवटे, निर्यणसागर वगैरेनींही विषयवारी करून गाथे छापले आहेत.(१)

तुकाराम तात्याचा ९ हजार अभंगांचा गाथा शके १८११ मध्ये प्रसिद्ध झाला. तुकारामांच्या अभंगाचा एकसुत्रीपणाने विचार केला म्हणजे यातील पुष्कळ अभंग तुकारामांचे नाहीत असे वाटते, तथापि इतर गाथ्यात नसलेले व यात असलेले सर्वच अभंग प्रक्षिप्त आहेत असा माझा आग्रह नाही. अभंगांचा शोध व निर्णय अद्याप कसोशीने झाला नाही.

बहुतेक जुन्या गाथ्यातून साडेचार हजार अभंगांपेक्षा अधिक अभंग नाहीत व इतकेच तुकारामांचे अभंग बहुधा सर्वमान्य आहेत. शके १८३१ मध्ये विष्णुबुवा जोग यांनी सार्थ गाथा छापला. सर्व अभंगांचा अर्थ करण्याचा प्रथम प्रयत्न या दृष्टीने हा गाथा कौतुकावह आहे. हा छापण्याचे काम मात्र तितके काळजीपूर्वक झालेले नाही.

वारकरीमंडळात पंढरपुरी असलेल्या दोन जुन्या वह्या प्रासादिक समजल्या जात आहेत. एक बडव्यांची वही व दुसरी माळ्यांची वही. बडव्यांची वही ही २०० वर्षापूर्वीचे प्रख्यात भक्त प्रल्हादबोवा बडवे यांच्यावेळची आहे असे म्हणतात. ही गंगुकाकांच्या मठात आहे. दुसरी माळ्यांची वही ही देहूकर व वासकर यांच्या फडात मान्य आहे. बडव्यांच्या वहीप्रमाणे आर्यभूषणप्रेसने हरिभाऊ आपटे यांच्या नजरेखाली एक गाथा छापला, त्यात ४०९२ अभंग आहेत, माळ्यांच्या वहीवर हुकूम गोडबोले बुकसेलर यांनी जगद्धितेच्छुप्रेसमध्ये गाथा छापून काढला, त्यात साडेचार हजार अभंग आहेत. हे दोन्ही गाथे १८३५ मध्ये प्रसिद्ध झाले. हे दोन्ही गाथे सांप्रदायिक असून वारकऱ्यांनी भजने त्याचप्रमाणे चालतात.[२] सारांश, तुकारामांच्या आयुष्याची माती आता पुन्हा नव्याने मळली आणि घोळली जाऊ लागली. स्वतः त्यांनीच आपल्या एका अभंगात म्हटले आहे,

'तुका म्हणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दीस जागृतीचा ।।'

जागृतीचा नवा दिवस त्यांच्या आयुष्यात नित्य उगवत राहिला. जागृतीचा संदेश घेऊन निर्माण झालेल्या त्यांच्या काव्याने महाराष्ट्रात एक चैतन्याची लाट निर्माण झाली. भक्तिसंप्रदायाला नवे सामर्थ्य प्राप्त झाले. कवितेच्या प्रांतातही एक नवी बलोद्धत, कल्याणकारी लाट उचंबळली. तुकारामांच्या वाणीचा रसरशीतपणा सर्वांच्या प्रत्ययाला येऊ लागला. एका थोर संताचे व थोर कवीचे दर्शन घडू लागले.[३]

तुकारामांच्या अभंग लेखनाचे स्वरूप आणि प्रयोजन पाहिले म्हणजे हे लेखन सर्वांच्या ऐहिक व पारमार्थिक उन्नतीसाठीच केले गेले हे लक्षात येते. तुकाराम कीर्तनाला उभे आहेत, त्यांचे वचनामृत प्राशन करण्यासाठी शेकडो लोक ज्यांत ब्राह्मणापासून शुद्रापर्यंत सारे जमले आहेत आणि ज्यांत शेतकरी, कष्टकरी वर्गाचाच भरणा अधिक आहे अशा लोकांना उपदेश करण्यासाठी कीर्तनाच्याच वेळीप्रामुख्याने या अभंगांची रचना झाली असावी. त्यात पुनरूक्ती आहे, पाल्हाळ आहे, पण त्यात मौलिक शिकवण आहे आणि ती जनसामान्यांसाठी आहे. तुकारामांनी जहितासाठीच हे सारे लिहिले याबद्दल लेशमात्रही संदेह नाही. त्यांच्या जीवनाला याहून अन्य हेतू उरला नव्हता. सर्वत्र हरीची भक्ती पसरावी, खऱ्या वैष्णवांची जगात दाटी व्हावी, म्हणून ते म्हणतात,

माझिये जातीचे मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया ।।
आवडे ज्या हरि अंतरापासूनि । ऐसियांचे मनी आर्त माझे ।।
तयालांगी जीव होतो कासावीस । पाहातील वास नयन हे ।।
सुफळ हा जन्म होईल तेथून । देता आलिंगन वैष्णवांसी ।।
तुका म्हणे तोचि सुदिन सोहळा । गाऊ या गोपाळ धणीवरि ।।(२०८६)[४]

संत तुकारामांच्या अभंगातून विठ्ठलाविषयीचा भक्तिमय भाव सतत ओसंडून वाहताना दिसतो. ज्यांच्या मनामध्ये परमेश्वराविषयीचे प्रेम आहे. अशाबद्दल माझे मन कासावीस होते. अशाच माणसाला लळा लावावासा वाटतो. अन् तो खरा दिवस, तोच खरा क्षण म्हणून साजरा केला पाहिजे. अशा प्रकारची भावना ते व्यक्त करतात.

आपल्या जातीचे वैष्णव जगात सर्वत्र पसरावेत, त्यांच्या भेटीगाठी व्हाव्यात आणि त्यांच्या पुण्यप्रद सहवासात जन्म सफल व्हावा असे एक स्वप्न या भक्ताने रंगविले आहे. हे साकार करायचे असेल तर आपल्या आजूबाजूला पसरलेल्या जगाला आपण बदलले पाहिजे, हे त्याला जाणवत होते व त्यासाठीच त्यांची धडपड चालू होती. तुकाराम स्वतःत गुंतून पडले नव्हते. त्यांच्या व्यापक, विशाल बनलेल्या व्यक्तित्त्वाने सर्वांना वेढा घातला होता. ते आपल्या ठायी साऱ्यांना आणि सर्वांच्या ठायी आपल्याला पाहू शकत होते. त्यांनी स्वतःच आपल्या उपदेशाला मेघवृष्टी असे संबोधिले आहे. ही दृष्टी भक्तिभावनेची आहे. 'सर्वांभूति विठ्ठल' पाहता आला पाहिजे. हेच त्यांच्या उपदेशाचे सार भक्ती हा सर्वजनसुलभ मार्ग असल्यामुळे त्याचा त्यांनी प्रचार केला.[५]

संज्ञा – तुकारामांचे अभंग, लेखनाचे स्वरूप आणि प्रयोजन, भागवतधर्म

प्रस्तावना –

तुकारामांची अभंगरचना विविध प्रकारची आहे. आत्मचरित्रपर, देवाचे सगुणरूप, नाम, एकविधता, सलगी उपदेश इत्यादि विषयावर ती असून वासुदेव, हमामा, टिपरी वगैरे रूपके, खेळिये, विराण्या, बाळक्रीडासारख्या विषयांवरही आहे. धर्माच्या नावाखाली दंभाचार करणारे संन्यासी, ब्रह्मचारी, मानभाव, शाक्त वगैरे वेषधाऱ्यांवर त्यांनी प्रहार केले आहेत. जनतेस खरा भागवतधर्म सांगताना धर्माच्या नावाखाली चालणारे धर्माभास व अनाचारही ओळखता आले पाहिजे हा त्यांचा हेतू आहे. शिवबाची भेट, वह्या बुडविण्याचा प्रसंग यांसारख्या घटनांच्या वेळचेही अभंग आहेत.

'देखोनी पुराणिकाची दाढी', 'आवा चालली पंढरपुरा', 'कानडीने केला मराठी भ्रतार','वाघे उपदेशिला कोल्हा' यासारखे विनोदी अभंगही आहेत. त्यावरून त्यांचा जीवनविषयक खेळकर दृष्टिकोन दृग्गोचर होतो.

१. अद्वैतपर अभंग :-

अद्वैती तुकारामांचे परब्रह्म, परमात्मा, जगदीश, जीव, जगत्, माया, बंध, मोक्ष याविषयीचे विचार हे असे आहेत, म्हणूनच

'जयाची वदे पूर्ण वेदान्त वाणी । कसे हो म्हणावे तयालागि वाणी ।
परब्रह्मरूपी असा जो तुकावा । तयाचें तुकीं कोण ऐसा तुकावा ।'

असे वामनाने म्हटले आहे.[६]

मराठी साहित्यातील विविध परंपरेचा अभ्यास करत असताना अनेक परंपरा असून कुणी द्वैती तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला तर कुणी अद्वैत तत्त्वज्ञानाचा अंगीकार केला. संत तुकारामांनी अद्वैत तत्वज्ञानाच्या माध्यमातून अभंगाच्या रूपाने विचार रूजवण्याचा प्रयत्न केला.

२. भक्तिपर अभंग :-

अद्वैत तत्त्वज्ञानाप्रमाणे ईश्वराजवळ मोक्षाचे गाठोडे नाही हे तुकारामांचे म्हणणे खरे असले तरी आपली मुळचीच मुक्तावस्था समजण्याकरीता ईश्वराच्या कृपेची भक्तियोगात आवश्यकता मानिली जाते. भक्ती ही तर तुकारामांची जीवननिष्ठा आहे. आत्मज्ञानापूर्वी व नंतरही आमरण भक्तियोगाचे आचरण त्यांनी केले. ईश्वरी साक्षात्कारानंतर त्याच्या प्रेमात रंगून जाऊन त्यांनी जी उत्स्फुर्त अभंगरचना केली ती भक्तिरसाने परिपूर्ण असल्यामुळे त्यांच्या अभंगांची गाथा म्हणजे भक्तिगाथाच झाली आहे.[७] म्हणून या महान भगवद्भक्ताचे भक्तियोगविषयक विचार प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. भक्ती हे सुत्रच वारकरी संप्रदायाचे मुख्य सुत्र आहे.

ईश्वराचे दर्शन, प्रसाद व कृपा होण्याकरीता भागवत धर्मात प्राधान्याने सांगितलेल्या भक्तियोगाच्या मार्गाने तुकाराम स्वत: गेले आणि त्यांना जे अनुभव आले तेच आपल्या अभंगात आत्मविश्वासाने त्यांनी व्यक्त केले. त्यांचे भक्तियोगाचे विवेचन हे केवळ तात्विक व तार्किक नाही. ते अनुभवावर आधारलेले आहे. 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूति । देह कष्टविती उपकारे' या कोटीतील तुकाराम असल्यामुळे 'अनुभवे आले अंगा' तेच त्यांनी जगाला दिले आहे.(२८४५)[८] कुठलाही सद्सद्विवेक असलेला माणूस आलेल्या चांगल्या अनुभवाची देणगी तो आपल्या अवतीभोवतीच्या समाजाला समर्पित करून सर्वसामान्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न करतो. तेच संत तुकारामांनी केलेले आहे.

भक्तियोगात श्रीहरीचे अखंड स्मरण, त्याच्या नामाचे मुखाने उधारण यांना जसे महत्त्व आहे. त्याप्रमाणे हरिकथेच्या कीर्तनालाही महत्त्व आहे. कारण कीर्तनात श्रीहरीचे स्मरण आहे. त्याप्रमाणे हरिकथेच्या कीर्तनालाही महत्त्व आहे. कारण कीर्तनात श्रीहरीचे स्मरण व नामाचे उधारण तर होतेच पण इतरांनाही श्रवणभक्तीचा लाभ परब्रह्म-परमात्मा किंवा परमेश्वर

तेवढा खरा असून बाकीचा पसारा व्यर्थ आहे असा अद्वैताचा सिद्धांत असल्यामुळे तद्भिन्न भासणाऱ्या बाकीच्या वस्तुचे भिन्नत्त्व खरे नाही. त्याच्याशिवाय दुसरे कशाचेच अस्तित्त्व नाही. 'विठो माउलीये हाचि वर देई। जेव्हा ते म्हणतात' तेव्हा तो त्यांचा अनुभव असतो.(९)

'संचारोनी राही हृदयामाजी' अशी आर्त विनवणी केल्यानंतर विठ्ठल जेव्हा तुकारामांच्या हृदयात येऊन राहिला तेव्हा त्यांच्यापेक्षा ते वेगळे राहिलेच नाहीत. तद्रूपच झाले, म्हणून ही अभंगवाणी माझी नव्हे, 'सखा भगवंत वाणी त्याची' असे जेव्हा ते म्हणतात तेव्हा तो त्यांचा अनुभव असतो. कीर्तनात या तऱ्हेने 'श्रवण, कीर्तनं विष्णोःस्मरणं' या तिन्ही भक्तिंचा एकत्र समावेश होत असल्यामुळे तुकोबांनी कीर्तनभक्तिचेही निरूपण केले आहे.

### ३. अंतःकरण शुद्धी :-

भक्तियोगात अंतःशुद्धीला म्हणजे चित्तशुद्धीला फार महत्त्व आहे. म्हणून 'सकळांच्या पाया माझे दंडवत। आपुलालें चित्त शुद्ध करा ।'(१०१) अशी पाया पडून तुकाराम महाराज सर्वांची विनवणी करतात. अंतःकरणातून स्वार्थ आणि षड्रिपू गेल्याशिवाय 'अवघे जन' आपले सोइरे व प्राणसखे होऊ शकत नाहीत. ही चित्तशुद्धी नामस्मरणाने होते आणि त्या चित्तांत 'शांतिक्षमा दया' नांदावयास येतात. 'काय काशी करितां गंगाः। भीतरि चांगा नाही तो।'(१३७) ज्याचे अभयंतर शुद्ध नाही त्याला काशीयात्रा व गंगास्नानाचा काय उपयोग? 'काय भस्म करील राख । अंतर पाक नाही तो ।'(७०९) अंतर शुद्ध नाही आणि वरून अंगाला राख फासली तरी तिचा काही उपयोग नाही. 'नाही निर्मळ जीवन । काय करील साबण । तैसी चित्त शुद्धी नाहीं । तेथे बोध करील काई ।'(७६५) म्हणून

बैसोनि निवांत शुद्ध करी चित्त । तया सुख । अंतपार नाहीं ।
येऊन अंतरी राहील गोपाळ । सायासाचे फळ बैसलिया ।। १७३३ ।।

चित्तातून कामक्रोधमत्सरादि षड्रिपू काढून, ते निर्मळ व शांत करून बसले असता जे सुख अनुभवाला येते ते अनंत व अपार आहे. कारण अश चित्तामध्ये प्रत्यक्ष परमेश्वर येऊन राहतो व बसल्या जागेवर सर्व श्रमांचे साफल्य होते. 'तीर्थ क्षेत्रात स्नान करून वरवर अंग घासल्याने चित्त शुद्ध होत नाही आणि जोपर्यंत अंतःकरण शुद्ध होत नाही' आणि 'तुका म्हणे नाही शांतिक्षमा दया। तोंवरी कासया फुंदा तुम्ही'(१७३२ तीर्थक्षेत्रांना गेल्याची बढाई फुकट आहे. 'तुमचे अंतःकरण परमेश्वर जाणतो म्हणून जर खरोखर स्वहित पाहिजे असेल तर चित्त शुद्ध करा.'(१०) पृथ्वीतलावरील प्रत्येक माणसाला माणूस म्हणून जगायचे असेल तर त्याने आपले मन निर्मळ ठेवून आचरण केले तर त्याचे तर हीत होतेच पण त्याचा आदर्शही समाज घेऊन आपलेही जीवन हितावह बनवण्याचा तो प्रयत्न करू लागतो.

### ४. सत्संगाचे महत्त्व :-

भक्तिमार्गात अशा सत्पुरुषांना व त्यांच्या संगतीला फार महत्त्व आहे. विश्वव्यापक ईश्वराशी समरस होऊन विश्वप्रेमाने भरलेल्या भक्तांचा सहवास साधकंना अत्यंत उपकारक असतो. अशा सत्पुरुषांच्या पवित्र विचारांनी व आचारांनी भारलेल्या मानसिक वातावरणाचा अप्रत्यक्ष परिणाम तर साधकांवर होतोच, पण त्यांची अमृत वर्षणारी वाणीही त्यांना मार्गदर्शन करीत असते.(११) वारकरी संप्रदायात सांगितलेला भक्तिमार्ग हाच एकमेव मार्ग आहे. विश्वप्रेमाने भरलेल्या भक्तगणांचा सहवास हा खऱ्या अर्थाने साधकांना उपकारक असून परमेश्वराशी एकरूप होण्यासाठी सत्पुरुषांची संगत महत्त्वाची असते असे हे तत्त्वज्ञानरूपी विचार त्यांच्या अभंगातून आलेले आहेत.

### ५. नैतिक आचरण :-

भक्तिमार्गात संतसंगतीइतकेच व्यावहारिक नीतीमत्तेलाही आवश्यक स्थान आहे किंवहुना व्यवहार नीतिपूर्ण व्हावा म्हणूनच संतांची संगती करावयाची असते. वाटेल त्या वाईट मार्गांची संपत्ती जोडावी आणि तिच्यातील काही भाग तीर्थयात्रा

किंवा देवपूजा यात खर्च करावा यामुळे पुण्यही मिळत नाही आणि परमेश्वरही प्रसन्न होत नाही, सत्य आणि सदाचार ही भक्तिमार्गाची प्रमुख पथ्ये आहेत. ईश्वर सर्वत्र असल्यामुळे इतरांना स्वार्थाकरिता फसविणे म्हणजे ईश्वरालाच फसविण्यासारखे असते. भक्तिमार्गाला लागलेले बहुतेक लोक सांसारिकच असतात. किंबहूना नामस्मरण, भक्तिच्या संदर्भात, संसार किंवा घरदार सोडण्याची आवश्यकता नाही असे तुकारामांनी सांगितल्याचे मागे पाहिले आहे. या सांसारिकांनी व्यवहार कसा करावा याविषयी तुकारामांनी अनेक अभंगातून उपदेश केला आहे. हा उपदेश मेघवृष्टीप्रमाणे आहे. पावसाचे पाणी सर्वत्र पडते पण जेथे भूमी नसून केवळ खडक असेल तेथे ते फुकट जाते. जमिनीच्या सकसनिकसपणावर पावसाच्या पाण्याचा कमी-अधिक उपयोग अवलंबून असतो. त्याप्रमाणे साधकांच्या ग्रहणशक्तीप्रमाणे उपदेशाचा कमी-अधिक परिणाम होतो.(१२) संत तुकाराम आपल्या अभंगातून भक्तिमार्गाचे तत्त्वज्ञान मांडताना सकल मानवजातीसाठी भक्तिमार्गाचा विचार सांगतात. त्यासाठी मेघवृष्टीचा संदर्भ देतात. पावसाचे पाणी जसे जमीन किंवा खटकाचा विचार करत नाही तसे साधकाचे असते. असा उपदेशही तुकारामांच्या अभंगातून येतो.

### ६. आत्मनिरिक्षणाची गरज :-

म्हणून मनुष्यांनी आत्मनिरीक्षण करावे व साधुत्वाचे ढोंग करू नये. 'ज्याच्या अंत:करणातून कुटिलता गेली नाही त्याने गळयात माळ घालू नये. ज्याच्या अंगी धर्म, दया, क्षमा, शांति नाही त्याने अंगाला राख फासून गोसावी होऊ नये. ज्याला भक्तीचा महिला कळला नाही त्याने ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी बोलू नयेत. ज्याने आपले मन जिंकले नाही, त्याने प्रपंच टाळू नये आणि ज्याला हरिभक्ति नाही त्याने भगवे वस्त्र धारण करू नये.'(१३) संत तुकारामांनी येथल्या प्रत्येक माणसांनी भक्तिमार्गाचा अवलंब करत असताना आत्मपरिक्षण करूनच भक्तिमार्गाला लागावे. ढोंगयुक्त जीवन न जगता खऱ्या अर्थाने हरिभक्तीला लागावे, अन्यथा त्याचा उपयोग होत नाही असे खडे सवालही त्यांनी उद्‌गारलेले दिसतात.

### ७. प्रापंचिकांना उपदेश :-

जोपर्यंत मनातून कोणत्याही गोष्टीची आशा गेली नाही तोपर्यंत 'सुखे असावे संसारी' असे तुकारामांचे संसार आणि प्रपंचाविषयीचे धोरण आहे. भक्तिसह व्यवहार प्रामाणिकपणे केला की, 'नारायण भेटी देईल.'

जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेच करा ।
उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ।
परउपकारी, नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ।
भूतदया गाई पशूंचे पालन । तान्हल्यो जीवन वनामाजी ।
शांतिरूपे नव्हे कोणाचा वाइट । वाढवी महत्त्व वडिलांचे ।
तुका म्हणे हेंचि आश्रमांचे फळ । परमपद बळ वैराग्याचे ।।(२८६४)

आदर्श गृहस्थाश्रमाचे वर्णन तुकारामांनी या अभंगात केले आहे. धन मिळवू नये असे नाही पण ते प्रामाणिकपणे व्यवहार करून मिळवावे आणि ज्यात आसक्ती ठेवून केवळ स्वत:करिताच त्याचा व्यय न करिता, स्वार्थनिरपेक्ष वृत्तीने त्या धनाचा सदुपयोग करावा. अशा गृहस्थाला पुढील चांगला जन्म येईल.(१४) संत तुकारामांनी आपल्या अभंगातून आदर्श सांसारीकत्त्वाचा उपदेश केलेला आहे. प्रामाणिकपणाने जीवन जगून प्रामाणिक संसाराचा गाडा चालवावा तरच अशांना आदर्शवत गृहस्थाश्रमी म्हणावे अन्यथा नाही. असा सांसारीक विचारही ते सडेतोडपणे मांडताना दिसतात.

### ८. समाजातील दंभाचारावर कोरडे :-

पण तुकारामांचे कार्य असे केवळ एकेरी नव्हते, संत सज्जनांची जशी त्यांनी स्तुती केली आहे, तशी दुष्टदुर्जनांवर कडक टीकाही केली आहे. सज्जनांपुढे तुकाराम महाराज पराकाष्ठेचे नम्र होते. उलट दुर्जनांवर टीका करताना ते पंचानन होत.

समाजातील ढोंग, दंभ, दुष्टपण पाहून त्यांचा संताप होई आणि कोणाचीही भीड मुरवत न ठेवता ते त्यावर तुटून पडत. तोंडाला येतील त्या शिव्याही ते संतापाच्या भरात देत. ही कडक टीका ज्यांच्या जिव्हारी लागली अशी लोकांनी तुकाराम अधिकार नसताना वेदोपनिषदांचा अर्थ सांगतात, अशी दिवाणात फिर्याद केली आणि त्यांच्या सर्व वाङ्मयाला जलसमाधी देण्यात आली, पण ईश्वराच्या कृपेने त्यांचे अमर वाङ्मय त्या जलदिव्यातून तरून वर आले आणि देवाने बालस्वरूपात त्यांना दर्शन देऊन त्यांच्या तेरा दिवसांच्या उपोषणाचे पारणे फेडले. ज्या दुष्ट दुर्जनांनी त्यांच्यावर हा प्रंसग आणला. तत्पूर्वी तुकारामांचा उपदेश, वेदोपनिषदे, गीता, ज्ञानेश्वरी, भागवत यांना अनुसरून कसा आहे ते पाहू.[१५] वारकरी संप्रदायातील संत तुकारामांचे अभंग आणि तत्त्वज्ञान आणि बाकी सर्व संतांचे तत्त्वज्ञान विचारात घेता असे लक्षात येते की, संत तुकारामांसारख्या स्पष्ट आणि सडेतोड विचार मांडणारा संत फारच विरळ म्हणूनच संत तुकारामांना 'विद्रोही संत' असे म्हटले जाते ते यासाठीच.

## ९. तुका झालासे कळस :-

तुकारामांची वचने बाह्यात्कारी कणखर पण पोटी जनहिताची अथांग करूण असणारी आहेत. तीत अत्यंत मोलाची व अर्थगर्भ सुभाषिते आहेत. त्याचे वर्णन पहिल्या प्रकरणात केलेच आहे. 'तुका झालासे कळस' या उक्तीत भागवतधर्म मंदिराचे कालानुक्रमाने वर्णन करण्यात पाया, विस्तार, खांब व नंतर कळस होतो, व अनुक्रमे ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व शेवटी तुकारामांचे नाव सहज येते. पण त्यांना कळस म्हणण्याचे मर्म त्यांच्या वाङ्मयात आहे. तुकारामांनी ज्ञानदेव-एकनाथांची पूर्वसुरींचा बोध संपूर्ण पचविला आहे व तो आपल्या स्फुट अभंगातून मोजक्या, रेखीव व समर्थ शब्दात सांगितला आहे. त्यामुळे त्यात ज्ञानेश्वरी, भागवत यांचे सारच आले आहे. पंढरीतील पांडूरंगाच्या कळसाच्या दर्शनाने देवदर्शन घडते, अशी भावना आहे. त्याप्रमाणे तुकारामरूपी कळसाच्या दर्शनाने म्हणजे त्यांच्या अभंगवाणीने ज्ञानेश्वरीभागवताचे रहस्य हाती येते जे म्हणून तुकाराम या अर्थाने कळसच होत. प्रा.न.र.फाटक यांनी आपल्या एका लेखातही गोष्ट विशद केली आहे. ते म्हणतात, ''वारकऱ्यांच्या संतमालिकेतील तुकाराम महाराजांना विठ्ठलभक्तिच्या मंदिरावरचा कळस असे मानले जाते. देवळाच्या कळसाचे दर्शन म्हणजे आतल्या देवाचेच दर्शन अशी भावना प्रचलित आहे. तुकाराम महाराजांच्या वाणीत जे तेज व सत्त्व आहे त्याची घट्ट ओळख असणारांनी ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ यांची ओळख करून घेतली नाहीतरी चालेल, तुकारामांच्या वाङ्मयात या सर्वांच्या शिकवणुकीचे रहस्य सापडेल अशा योग्य उद्देशाने त्यांना भागवतधर्म मंदिाचा कळस म्हणण्याची प्रथा पडली.''[१६] वारकरी संप्रदायात संत तुकारामानंतर अनेक संत होऊन गेले पण इतर संतांपेक्षा संत तुकारामांचा विचार, तत्त्वज्ञान त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आणि पुढे नेणारा नसल्यामुळेच संत बहिणाबाईने वारकरी संत परंपरेतील संत तुकाराम हे कळस असल्याचे म्हटलेले आहे. यात कुठलीच अतिशयोक्ती नाही. बहिणाबाईच्या म्हणण्याला त्यांच्या विचारत्त्वानेच पुष्टी देऊन ते सिद्ध केलेले आहे.

## निष्कर्ष :—

तुकारामांचा अत्यंत आवडता अलंकार दृष्टांत हा आहे. तुकारामांच्या कवितेत सुभाषिते, दृष्टांत,उपमा, प्रतिमा, रूपके, प्राकृथा आदी भाषाव्यवहारांचा खाचाखच भरणा आहे. परंतु लौकिक अर्थाने ह्या संकल्पनाच्या अर्थकाठांना ओलांडून तुकारामांची भाषा महापुराच्या पाण्यासारखी द्रुतगतीने धावू लागते. प्रसरणशीलता हा तुकारामांच्या अभंगाचा पुन्हा एक आवश्यक घटक आहे.

तुकारामांच्या अभंगाच्या भाषेचा कणा नादमय आहे. कधी ती युद्धाचा पवित्रा घेते. कधी भक्तीचा पावित्रा घेते. कधी धर्म-अधर्माच्या प्रतिपादनाचा पवित्रा घेते. कधी सदाचार आणि नीतितत्त्वांच्या निरूपणाच्या रूपात प्रकटते. कधी स्वत:चीच आत्मपरीक्षा पाहण्याच्या कसोटीला लागते. कधी ती देवाशी भांडण करते तर कधी देवाशी सख्यभाव सांगते. कधी द्वैताद्वैताच्या खेळात रमते तर कधी विरहिणीचे गीत गाते. कधी तो विनोदाने सामाजिक व्यक्तिचित्रणात रमते तर कधी सृष्टीशी संवाद साधते. कधी ती सगुणाचे रूप साकार करते. तर कधी निर्गुणाचे गोडवे गाते. कधी ती रसात रमते तर कधी रोकडे बोल बोलते. कधी ती भावस्थिती व्यक्त करते तर कधी आत्मस्थिती व्यक्त करते. कधी ती वेदांचा अर्थ व्यक्त करते तर कधी संतांची उत्तरे बोलते. कधी ब्रह्मरसाचे गोडवे गाते तर कधी ती मानसाच्या देवत्त्वाचे गोडवे गाते. अशा अनेकविध परस्परविरोधी; परंतु मुळात परस्परपूरक आशयविषयांना ती परिसाचा स्पर्श करून तिचे सोने करते. ह्या सबंधं पार्श्वभूमीवर

तुकारामांच्या कवितेचा नाद युगाचे स्पंदन व्यक्त करतो. संत तुकारामांच्या अनेक अभंगातून अदृश्य पद्धतीचे नाद कवितेत उमटलेले आहेत. 'आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदचि अंग आनंदाचे,' हा आनंदाचा गूढ गुंजणारा नाद तर युगालाही भारावून टाकणारा आहे. म्हणूनच रा.ग.हर्षे, दि.पु.चित्रे, भालचंद्र नेमाडे अशा अनेक अभ्यासक, जाणकारांनी तुकारामाला महाकवी म्हटले आहे. महाकाव्याची सर्व लक्षणे तुकारामांच्या काव्यातून आविष्कृत झाली आहेत. सृष्टीच्या चराचराशी नाते सांगणारी आणि सबंध सृष्टीला मानव्याच्या सूत्रात गोवणारी तुकारामांची कविता महाकाव्याचेही बांध फोडून काळाच्या सीमा तोडून सुसाट वेगाने धावताना दिसते. तुकारामांची कविता म्हणूनच युगकविता आहे. युगाचे स्पंदन आहे. प्रत्येक काळात तिने मानवाला जीवदान दिले आहे.

## संदर्भ ग्रंथ :–


१) पांगारकर ल.रा., उन्नि, पृ. ०७.
२) तत्रैव, उन्नि, पृ. ०८.
३) फडकुले निर्मलकुमार, उन्नि, पृ. २९.
४) कर्णिक मधु मंगेश, उन्नि, पृ.
५) फडकुले निर्मलकुमार, उन्नि, पृ. ७६.
६) पेंडसे शं.दा., उन्नि, पृ. ६१.
७) तत्रैव, उन्नि, पृ.७४
८) तत्रैव, उन्नि, पृ. ७४
९) तत्रैव, उन्नि, पृ. ८३
१०) तत्रैव, उन्नि, पृ. ९१
११) तत्रैव, उन्नि, पृ. १०६
१२) तत्रैव, उन्नि, पृ. ११२
१३) तत्रैव, उन्नि, पृ. १९
१४) तत्रैव, उन्नि, पृ. ११९
१५) तत्रैव, उन्नि, पृ. १३३
१६) बहिरट भा.प., उन्नि, पृ. २०४